# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### परभणी जिल्हयातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ताब्यातील खुल्या जागावर अतिक्रमण झाल्याबाबत

**(१) ८७०६ (१७-०६-२०२१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या ताब्यातील खुल्या जागा, इमारतीच्या संरक्षणाच्यादृष्टीने त्या जागांना कुंपण घालणे, मालकीबाबत स्पष्ट फलक लावणे व इतर बाबींवर नियंत्रण ठेवण्याबाबत उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांची मालमत्ता अधिकारी म्हणून नेमणुक करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित अधिकाऱ्यांनी जबाबदारी पार न पाडल्याने जिल्हयातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जागेवर अतिक्रमण झाल्याने त्यांच्याविरूध्द कारवाई करण्याबाबत विभागीय आयुक्त, परभणी यांचेकडे तेथील सामाजिक कार्यकर्त्यांनी सन २०२१ मध्ये वा त्यादरम्यान ई-मेलव्दारे तक्रार नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अतिक्रमणे दुर करणे, अतिक्रमणधारकांविरूध्द पोलिसांत फिर्याद नोंदविणे, त्या जागांचा पुनर्विकास करणे व इतर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच, केलेल्या कार्यवाहीची थोडक्यात सविस्तर माहिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१५-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे. तथापि, सदर तक्रार तपासाअंती मोघम स्वरुपाची आढळून आली आहे.
(३) सदर तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्याकडून अहवाल मागविण्यात आला असून जिल्हा परिषद शिक्षण विभाग व बांधकाम विभाग व पशु संवर्धन विभागाच्या अनूक्रमे (१) ३ जागा, (२) ३ जागा व (३) १ जागा अशा एकूण ७ जागा नावाने करण्याची बाब न्यायप्रविष्ट आहेत. जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागाच्या २ जागांवरील अतिक्रमणे हटविण्याची कार्यवाही सुरु आहे.

- पंचायत समितीच्या कोणत्याही जागावर अतिक्रमणे झालेली नाहीत.
- विभागाचे शासन निर्णय क्र:प्रआयो-२०१७/प्र.क्र.३४८/ योजना-१०, दिनांक १६/०२/२०१८ अन्वये, जिल्हयातील एकूण ७०४ ग्रामपंचायती अंतर्गत गावठाण हद्दीतील ३२४९ अतिक्रमणे नियमानुकुल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी जिल्हयातील राष्ट्रीय महामार्ग व बाहयवळण रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२) ८७२८ (११-०६-२०२१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ६१ तसेच बाहयवळण रस्त्याचे काम विहित मुदतीत पूर्ण न करता वेळकाढू धोरण राबविणाऱ्या कंत्राटदार व अधिकारी यांच्याविरूध्द कारवाई करण्याबाबतची मागणी परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी सचिव (रस्ते) व मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे सन २०२१ मध्ये वा त्यादरम्यान ई-मेलव्दारे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या कामाकरीता जमीन ताब्यात न घेणे, भूसंपादनासाठी आलेली रक्कम वाटप करुन रस्त्याच्या कामास त्वरित सुरूवात न करणे, भरावाचे काम दर्जेदार नसणे, कंत्राटदार व अधिकारी यांच्याकडून कामास गती देण्यात न येणे इत्यादी प्रकरणी विहित मुदतीत कार्यवाही न केल्याने सदर रस्त्याचे काम अद्याप अपूर्णावस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधीत दोषी कंत्राटदार व अधिकारी यांचेविरूध्द कारवाई करुन सदर रस्त्याचे काम त्वरित पूर्ण करण्याबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची थोडक्यात सविस्तर माहिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (२३-०६-२०२१) :** (१) अशा आशयाचे सचिव (रस्ते) यांना पृष्ठांकित केलेले पत्र प्राप्त झाले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

# यवतमाळ जिल्ह्यातील महावितरणच्या पुसद उपविभागातील वीज ग्राहकांना बोगस रिडींग घेऊन अधिकचे वीज बिल पाठविण्यात आल्याबाबत

**(३) ८७९६ (१५-०६-२०२१) डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील महावितरणच्या पुसद उपविभागातील वीज ग्राहकांना सुमारे ६० टक्के वीज मीटरचे बोगस रिडींग घेऊन अधिकचे वीज बील पाठवून महावितरण वीज ग्राहकांची आर्थिक फसवणूक करीत असल्याची बाब माहे मे, २०२१ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यवतमाळ जिल्ह्यातील महावितरणच्या पुसद उपविभागातील वीज ग्राहकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्यांवर व अधिकचे वसूल केलेले वीज बील वीज ग्राहकांना परत करण्याबाबतच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने यवतमाळ जिल्ह्यातील महावितरणच्या पुसद उपविभागातील वीज ग्राहकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या संबंधितांवर योग्य ती कार्यवाही करुन व अधिकचे वसूल केलेले वीज बील वीज ग्राहकांना परत करावे, या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१७-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) अमरावती परिमंडळाअंतर्गत यवतमाळ मंडळाअंतर्गत पुसद उपविभागातील मोबाईल ॲपद्वारे मीटर वाचनाचे काम कंत्राटदार मे.साई एन्टरप्रायजेस मालेगाव यांना सोपविण्यात आलेले आहे. सदर कंत्राटद्वारे घेतलेल्या एकूण मीटर वाचनापैकी माहे फेब्रुवारी, २०२१, मार्च, २०२१ व एप्रिल, २०२१ मध्ये अनुक्रमे २६३, ४७४, २९९ वीज ग्राहकांकडून चुकीच्या विद्युत देयकाच्या तक्रारी प्राप्त झाल्या व त्याप्रमाणे वीज बिलाची दुरुस्ती करण्यात आलेली आहे. त्यानुसार कंत्राटदाराच्या देय असलेल्या रकमेतून एकूण रुपये १९,५०६/- दंडाची रक्कम कपात केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

# सोलापूर जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द कुटुंबासाठी रमाई आवास योजनेच्या मंजूर अनुदानाची रक्कम मिळण्याबाबत

**(४) ८८०० (१७-०६-२०२१) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द कुटुंबासाठी सामाजिक न्याय विभागामार्फत रमाई आवास योजना राबवली जात असून या योजनेंतर्गत प्राप्त ६६९० अर्जांपैकी जेमतेम ३३५४ लाभार्थ्यांना मंजुरी मिळाली असून त्यापैकी केवळ २२३४ लाभार्थ्यांना निधी वाटप करण्यात आला असल्याची बाब माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यातील काही लाभार्थ्यांना मंजूर अनुदानाच्या रक्कमेतील फक्त पहिला हप्ता देण्यात आला असून दुसरा हप्ता अद्याप देण्यात आलेला नाही त्यामुळे अपूर्ण राहिलेल्या बांधकामामुळे लाभार्थ्यांना स्वत:च्या हक्काच्या घरापासून वंचित रहावे लागत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने लाभार्थांना मंजूर अनुदानाची संपूर्ण रक्कम तसेच ज्यांना दुसरा हप्ता मिळाला नाही ती रक्कम मिळण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (२०-१२-२०२१) :** (१, (२) व (३) होय, हे अंशत: खरे आहे.

सोलापूर महानगरपालिका क्षेत्रासाठी रमाई आवास योजनेंतर्गत एकूण ६६९० उद्दीष्ट देण्यात आले आहे. त्यापैकी सन २०२०-२१ पर्यंत ३३५४ लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम करण्यासाठी मंजूरी देण्यात आलेली असून त्यापैकी २३०० घरकुलांचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. ६५४ इतक्या लाभार्थ्यांचे घरकुलाचे बांधकाम प्रगतीपथावर असून त्यांना बांधकामाच्या प्रगतीनुसार हप्ते वितरीत करण्यात आलेले आहेत. तसेच ४०० लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे सादर केलेली नसल्याने निधी वितरण करण्यात आलेले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

## राज्य प्रकल्प समन्वयक तथा सहसंचालक (प्रशासन) यांना निलंबित करण्याबाबत

**(५) ८८०५ (२०-०७-२०२१) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.उच्च न्यायालयाचा, मा.मुख्यमंत्र्यांचा व विधानपरिषद सभागृहाचा अपमान करणारे पत्र दिनांक ०४/०२/२०२१ रोजी निर्गमित केल्याप्रकरणी श्री.राजेंद्र पवार, राज्य प्रकल्प समन्वयक तथा सहसंचालक (प्रशासन) यांना तात्काळ निलंबित करून सदर पत्र रद्द घोषित करण्याबाबतची मागणी नागपूर विभागाच्या शिक्षक लोकप्रतिनिधींनी शासनास दिनांक ०५/०२/२०२१, ११/०२/२०२१, १५/०२/२०२१ व ०६/०३/२०२१ रोजी पत्र पाठवून केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार सहसंचालक यांना निलंबित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१) होय.

(२) रिट याचिका क्र.१०३०/२०१६ प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक २५/०८/२०१६ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरुन अपंग समावेशित शिक्षण (माध्यमिक स्तर) उपक्रमांतर्गत पात्र विशेष शिक्षकांची शैक्षणिक अर्हता तपासून त्यांना नियुक्ती देण्यासाठी शिफारस करण्याबाबत राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली. उक्त समितीमध्ये श्री.राजेंद्र पवार यांचा समावेश नाही. या समितीकडून तपासणीनंतर राज्य प्रकल्प संचालक यांनी दिनांक २९/१२/२०२० च्या पत्रान्वये अहवाल शासनास सादर केला आहे. प्राप्त अहवालानुसार १३५८ विशेष शिक्षकांच्या कागदपत्रांची तपासणी करुन यापैकी ६३० गुणवत्तेनुसार पात्र विशेष शिक्षकांना समग्र शिक्षा योजनेंतर्गत विहीत केल्यानुसार पदस्थापना देण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात विनाअनुदानित शाळा व नैसर्गिक वाढीच्या तुकड्यांना अनुदान मंजूर करणेबाबत

**(६) ८८१० (१५-०६-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.किशोर दराडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विनाअनुदानित तत्वावर परवानगी दिलेल्या प्राथमिक, माध्यमिक शाळा व नैसर्गिक वाढीच्या तुकड्यांना अनुदान देण्यासाठी मूल्यांकन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात नैसर्गिक वाढीव तुकड्यांना शासनाची मान्यता मिळण्याबाबत संबंधितांकडून संबंधित विभागाकडे वारंवार मागणी करण्यात येत असल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून सदरहू शाळा व वर्ग तुकड्यांची तपासणी होऊन पुणे संचालक, आयुक्त व मंत्रालय स्तरावर प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, राज्यात बिगर आदिवासी क्षेत्रातील ५७१८ व आदिवासी क्षेत्रातील २५५ अशा एकूण ५९७३ अतिरिक्त व नैसर्गिक वाढीच्या तुकड्या सन २०१२-२०१३ पासून शासनाने विना अनुदान तत्वावर मंजूर केल्या असून उक्त सर्व शाळांचे अनुदान मंजूरीबाबतचे प्रस्ताव मंत्रालयात दीर्घ कालावधीपासून प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू शाळा व वर्ग तुकड्यांना अनुदानास पात्र करून अनुदान मंजूर करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच, उक्त सर्व प्रलंबित प्रस्ताव निकाली काढून वेतन अनुदान प्रचलित नियमानुसार देण्याची व्यवस्था केव्हापर्यंत करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१), (२), (३) व (४) होय, हे खरे आहे.

मुल्यांकन झालेल्या परंतु अघोषित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या प्रस्तावांची यादी आयुक्त (शिक्षण) यांचे स्तरावर दिनांक ०१/११/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून, उपरोक्त याद्यामधील पात्र

बाबतच्या हरकती तसेच त्रुटी पूर्तता संबंधित संस्था/ शाळा यांनी दिनांक ०६/१२/२०२१ पर्यंत करण्याबाबत सूचित केले आहे.

आयुक्त (शिक्षण) यांच्याकडून याबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर मंत्रीमंडळाच्या मान्यतेने सदर प्रस्तावावर योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत

**(७) ८८३७ (१७-०६-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुरेश धस, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १०, २०, ३० वर्षाच्या सेवेनंतर आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून मागणी होत असून राज्यातील प्राथमिक शिक्षक वगळता माध्यमिक शिक्षकांसह इतर सर्व कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना लागू करण्यात आली परंतु सदरहू योजनेमध्ये जाणीवपूर्वक जिल्हा परिषद शाळेतील प्राथमिक शिक्षकांना १०, २० व ३० वर्षाची आश्वासित प्रगती योजना अद्यापी लागू करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र.विउसु-३२१९, दिनांक ३१ जुलै, २०१९ अन्वये सदरहू प्रकरणी आयुक्त (शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगटाची नियुक्ती करण्यात आली होती, सदरहू अभ्यासगटाने या विषयासंदर्भातील अहवाल व त्यावरील शिफारशी शासनास आजपर्यंत सादर केल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी नागपूर विभागाच्या शिक्षक जनप्रतिनिधींनी दिनांक १२/०९/२०२०, ११/१०/२०२०, २८/१२/२०२० व ३०/०१/२०२१ रोजी शासनास निवेदन पाठवून झालेल्या विलंबाबाबत चिंता व्यक्त करून अविलंब अहवाल व शिफारशी मागविण्याची विनंती केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार सातव्या वेतन आयोगातील तरतुदीप्रमाणे जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांना आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
सदर समितीचा अहवाल प्राप्त झालेला आहे.
(३) हे खरे आहे.
(४) सदर समितीचा अहवाल प्राप्त झाला असून त्याबाबत आवश्यक कार्यवाही शासनस्तरावर सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सुर्या प्रकल्पातील पुनर्वसित चंद्रनगर व हनुमान नगर (ता.डहाणू, जि.पालघर) गावे मूलभूत सुविधांपासून वंचित असल्याबाबत

**(८) ८९५६ (०९-०६-२०२१) श्री.रविंद्र फाटक, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुर्या प्रकल्पांतर्गत धामणी व कवडास (ता.डहाणू, जि.पालघर) हे दोन्ही धरणप्रकल्प राबविण्यात येऊन त्यासाठी सन १९८० मध्ये वा त्यादरम्यान तेथील शेतकऱ्यांच्या जमिनी या प्रकल्पासाठी शासनाने संपादित केल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तेथील शेतकऱ्यांचे पुनर्वसन चंद्रनगर व हनुमाननगर (ता.डहाणू, जि.पालघर) येथे करण्यात आले असून सुर्या प्रकल्पातील पुनर्वसित गावांनी सर्व मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत वारंवार शासनाकडे मागणी केली तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनीही तत्संदर्भात शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने पुनर्वसन केलेल्या पालघर तालुक्यातील उपरोक्त दोन्ही ठिकाणी ४० वर्षानंतरही अद्याप रस्ते, वीज, शाळा, आरोग्यसारख्या मूलभूत सुविधा शासनाकडून उपलब्ध करण्यात आल्या नसल्याचे दिनांक ११ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शेतकऱ्यांनी शासकीय प्रकल्पासाठी शेतजमिनी व घरांच्या जमिनी देऊनही या पुनर्वसित ठिकाणी ४० वर्षानंतरही रस्ते, वीज, शाळा व आरोग्यविषयक मूलभूत सुविधा न पुरविण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सुर्या प्रकल्पातील पुनर्वसित गावांना विनाविलंब सर्व सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (१८-११-२०२१)** : (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) मौजे वणई (चंद्रनगर), ता.डहाणू व मौजे शिगाव (हनुमाननगर) ता.पालघर येथील पुनर्वसित गावठाणात महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियमानुसार देय असलेल्या नागरी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.

मौजे वणई (चंद्रनगर), ता.डहाणू व मौजे शिगाव (हनुमाननगर) ता.पालघर येथील पुनर्वसनाचे काम दिनांक ३१/०५/१९८५ पूर्वीच पूर्ण झाले असून सन १९८८ मध्ये जिल्हा परिषदेकडे सर्व नागरी सुविधा हस्तांतरीत करण्यात आल्या आहेत.

चंद्रनगर, ता.डहाणू या गावाची लोकसंख्या २०३९ असून सदर गावामध्ये वीज पुरवठा, नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीकोनातून रस्ते, जिल्हा परिषद शाळा इयत्ता १ ते ८ वी पर्यंत असून चंद्रनगर गावातील ५ पाड्यांवर अंगणवाडी केंद्रांची इमारत आहे. ग्रामपंचायत वणई चंद्रनगर अंतर्गत प्राथिमिक आरोग्य केंद्र असून आरोग्यविषयक मूलभूत सुविधा उपलब्ध आहेत.

तसेच हनुमाननगर, ता.पालघर या महसूली गावाची लोकसंख्या १६९१ असून सदर गावामध्ये वीज पुरवठा, नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीकोनातून रस्ते, जिल्हा परिषद शाळा इयत्ता १ ते ७ वी पर्यंत आहे व दोन अंगणवाडी केंद्रांची इमारत आहे. ग्रामपंचायत हनुमाननगर अंतर्गत उपकेंद्र हनुमानगर असून आरोग्यविषयक मूलभूत सुविधा उपलब्ध आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## स्व. बाळासाहेब ठाकरे ग्रामपंचायत भवन योजनेला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(९) ८९८३ (१५-०७-२०२१) श्री.गोपीकिसन बाजोरिया :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये शासनाने पाच वर्षापूर्वी नविन ग्रामपंचायत भवन बांधण्याकरीता स्व. बाळासाहेब ठाकरे ग्रामपंचायत भवन या योजनेची घोषणा केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेची सुरूवात झाल्यापासून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला नाही, तसेच, सद्य:स्थितीत ही योजना अस्तित्वात असल्यास तीचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त योजनेंतर्गत अकोला, वाशिम, बुलढाणा व अमरावती जिल्हयांना अत्यंत अल्प प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त योजनेला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१५-१२-२०२१) :** (१), (२), (३), (४) व (५) दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये “मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना” ह्या योजनेस शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आलेली आहे.

ग्रामपंचायत बांधकामाच्या प्रगतीनुसार आतापर्यंत रुपये २७४२.७० लक्ष इतका निधी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या ग्रामपंचायतींना वितरीत करण्यात आलेला आहे.

सद्य:स्थितीत सदर योजनेंतर्गत आतापर्यंत बुलढाणा जिल्ह्यास मागणीनुसार दिनांक २६ फेब्रुवारी, २०२१ व दिनांक २५ मार्च, २०२१ रोजीच्या ज्ञापनाने जिल्ह्यातील ३१ ग्रामपंचायतींना रुपये ४१५.८० लक्ष, तसेच अमरावती जिल्ह्यास मागणीनुसार दिनांक २५ मार्च, २०२१ व दिनांक २१ ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या ज्ञापनाने ७ ग्रामपंचायतींना रुपये ८१.३६ लक्ष, इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

उर्वरीत अकोला व वाशिम जिल्ह्याची मागणी अप्राप्त असल्यामुळे संबंधित जिल्ह्यांना निधी वितरीत करण्यात आलेला नाही. संबंधित जिल्ह्यांची मागणी प्राप्त झाल्यावर निधीच्या उपलब्धतेनुसार निधी वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

---

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे रोबोटिक सर्जरी प्रणाली कार्यान्वित करण्याबाबत

**(१०) ८९९६ (१०-०६-२०२१) श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, डॉ.परिणय फुके, श्री.रमेश कराड, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे रोबोटिक प्रणाली खरेदीकरीता रुपये १७ कोटी निधी मंजूर असून शासन आदेशानुसार ही यंत्रणा हाफकिन बायोफार्मास्यूटिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेडद्वारे खरेदी करावयाची आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा खनिकर्मद्वारे धनादेश क्रमांक १३५८०, दिनांक २०/८/२०१९ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयामार्फत हाफकिन मंडळाकडे आरटीजीएसच्या माध्यमातून वर्ग करण्यात आली, परंतु अद्याप खरेदी प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रोबोटिक सर्जरीद्वारे गंभीर व जटील शस्त्रक्रिया करण्यास सोईस्कर ठरणार असल्याने सदर खरेदी प्रक्रिया जलद होण्यासाठी नागपूर येथील लोकप्रतिनिधींनी मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री यांच्याकडे माहे मार्च, २०२१ मध्ये निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रोबोटिक यंत्रणा खरेदी प्रक्रिया तात्काळ राबविण्यात यावी यासंबंधीचे निर्देश शासन हाफकिन मंडळास देणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (२०-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) हाफकीन महामंडळाकडून एकूण ३ वेळा निविदा प्रक्रिया प्रसिध्द करुनही निविदेच्या अटी व शर्तीची पुर्तता होत नसल्याने, पुर्ननिविदा सुचना प्रसिध्द करण्यात आलेली असून सदर यंत्र खरेदीची कार्यवाही हाफकीन महामंडळाकडून सुरु आहे.

---

## डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील रोजंदार मजूरांची रिक्त पदे सेवाज्येष्ठतेने भरण्याबाबत

**(११) ९००२ (१४-०६-२०२१) श्री.गोपीकिसन बाजोरिया :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील रोजंदार मजुर व प्रकल्पग्रस्तांबाबत शासन निर्णय क्र. संकिर्ण १४१५/प्र.क्र.१२/६-अे, दिनांक २४ जुलै, २०१५ नुसार निर्गमित करण्यात येवून विद्यापीठांतर्गत रोजंदारीवर काम करीत असणाऱ्या रोजंदार मजूरांची दिनांक ३१ मार्च, २०१५ पर्यंतची अंतिम ज्येष्ठता यादी तयार करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यापीठातील रोजंदार मजूरांना सेवाज्येष्ठतेने विद्यापीठ सेवेत सामावून घेण्याबाबत दिनांक २५ मे, २०१८ रोजी विद्यापीठ कार्यकारी परिषदेने ठराव क्र. काप/३३/२०१८ नुसार मंजूरी प्रदान केली असून विद्यापीठ

पत्र क्र. बीएमसी/रो.म/१०५७/२०१८, दिनांक २२ जून, २०१८ अन्वये ज्येष्ठता यादी महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे मंजूरी मिळणेकरीता शिफारस केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी ९६ वी बैठक मा.कृषी मंत्री तथा अध्यक्ष, कृषी परिषद यांच्यास अध्यक्षतेखाली दिनांक २७ जून, २०१८ रोजी आयोजित केलेल्या बैठकीमध्ये डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील मजूरांच्या रिक्त जागा भरण्याबाबतचा ठराव क्र.३७/९६/२०१८ पारित करुन त्यानुसार शासनास शिफारस करण्याबाबतचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला, त्यानुसार डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला चे पत्र क्र.बीएमसी/रो.म/१२१९/२०१८, दिनांक ७ जुलै, २०१८ अन्वये उपसचिव (६-अे) कृषी संवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग सादर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विद्यापीठात मजुर संवर्गाची ८०६ मंजूर पदांपैकी रिक्त असलेली ५५० पदे सेवाज्येष्ठतेने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१६-१२-२०२१)** : (१) होय, खरे आहे.

(२) व (३) होय, खरे आहे.

(४) कृषी विद्यापीठातील रोजंदारी मजुर, कुशल व अर्धकुशल कर्मचाऱ्यांना सेवेत कायम/नियमित करण्याबाबत शा.ना.दिनांक २४ जुलै, २०१५ अन्वये कार्यवाही पूर्ण झाली असल्याकारणाने डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला चे पत्र क्र. बीएमसी/रो.म. /१२१९/२०१८, दिनांक ७ जुलै, २०१८ अन्वये प्राप्त झालेला प्रस्ताव अमान्य करण्यात आलेला आहे.

विद्यापीठातील रोजंदारी मजुरांच्या सेवाज्येष्ठता यादीस मान्यता देण्याची बाब ही विद्यापीठाच्या अखत्यारीतील असून याबाबत विद्यापीठास कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील वीज वितरण कंपनीच्या निष्काळजीपणामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याबाबत

**(१२) ९०५९ (१७-०६-२०२१) श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात ऐन उन्हाळ्यात वीज वितरण कंपनीकडून कधी थकित वीज बिल तर कधी नदीतील पाणी सोलापूर येथे लवकर पोहोचावे याकरीता मोठ्या प्रमाणात भारनियमन सुरू केल्यामुळे शेतकऱ्यांची उभी पिके जळून जात असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेकडो शेतकऱ्यांनी वीज बिले भरून देखील दररोज नवीन नियमावली बनवत वीज पुरवठा जाणून-बुजून खंडित करण्याचा प्रकार वीज वितरण कंपनीकडून सुरु असून वीज वितरण कंपनीच्या निष्काळजीपणामुळे मोठ्या प्रमाणात शेतपिकांचे व शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने वीज वितरण प्रकरणी जबाबदार असलेल्या वीज वितरण कंपनीच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१७-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान थकीत वीज बिलासाठी शेतकऱ्यांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आलेला नाही. तसेच उजनी जलाशयामधून कृषी आवर्तनाकरीता व पिण्याच्या पाण्याकरीता सिना व भिमा नदीमध्ये पाणी सोडल्यानंतर जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या आदेशानुसार नदीकाठचा वीज पुरवठा ठराविक कालावधीसाठी खंडीत करण्यात येतो.

(२) हे खरे नाही.

माहे सप्टेंबर, २०२० अखेर सोलापूर जिल्हयातील एकूण ३,६७,९३२ कृषी ग्राहकांकडे रुपये ५२०२.३१ कोटीची थकबाकी होती. जिल्हयात मागील काही वर्षात कृषी वीज बिलाची वसुली नगण्य आहे. विद्युत कायदा, २००३ अन्वये व कृषी धोरण, २०२० नुसार कृषी पंपाचे चालू वीज देयके न भरलेल्या ग्राहकांचा वीज पुरवठा १५ दिवसाची नोटीस देऊन खंडीत करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर येथील मेडीकलमध्ये प्लेटिना प्रोजेक्ट प्रलंबित असल्याबाबत

**(१३) ९१३१ (१०-०६-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील मेडीकलमध्ये जगातील सर्वात मोठा प्लेटिना प्रोजेक्ट (प्लाजमा थेरेपी इन नोव्हेल कोरोना व्हायरस असेसमेंट) प्रलंबित असून सुरु केलेला प्रोजेक्ट शासनाने थांबविला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रोजेक्टचे उद्‌घाटन मा.मुख्यमंत्री यांच्या हस्ते दिनांक २८ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्लेटिना प्रोजेक्टमध्ये सहभागी असलेल्या २१ रूग्णालयांवर शासनाचे प्रत्येकी रूपये ३२ लाख खर्च झालेले असून यंत्र सामुग्रीचा वापर आता ऑफलाईन प्लाझमा दानावर होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोरोना प्रादुर्भाव लक्षात घेता रूग्णाचा मृत्यू रोखण्यासाठी हा प्रोजेक्ट पुनः सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (२९-१०-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे

प्लाझ्मा ट्रायल व ऑफलेबल प्लाझ्मा थेरेपी (DSMB) डाटा सेफ्टी मॅनेजमेंट बॉर्ड यांनी सादर केलेल्या अहवालातील निष्कर्षाच्या अनुषंगाने कोविड-१९ या रुग्णांना प्लाझ्मा ट्रायलचा फायदा होत नसल्याचे दिसून आल्याने सदर ट्रायल थांबविण्यात आले.

(२) हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## देवगांवफाटा (ता.सेलू) येथील वीज उपकेंद्राचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१४) ९१५४ (०९-०६-२०२१) श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवगांवफाटा (ता.सेतू, जि.हिंगोली) येथील ३३ के.व्ही. वीज उपकेंद्र अंतर्गत गणेशपूर फिडरचे सिंगल फेजचे काम गत ६ वर्षापासून अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देवगांवफाटा येथील ३३ के.व्ही. वीज उपकेंद्र अंतर्गत गणेशपूर फिडरचे सिंगल फेजचे काम करण्यासाठी कंत्राटदाराने ६ वर्षांपूर्वी पैसे घेतले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने महावितरणचे शासकीय अधिकारी व संबंधित कंत्राटदार यांच्यावर कारवाई करुन देवगांवफाटा येथील ३३ के.व्ही. वीज उपकेंद्र अंतर्गत गणेशपूर फिडरचे सिंगल फेजचे काम तात्काळ पूर्ण व्हावे यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१७-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

तसेच देवगांव फाटा (ता.सेलू) हा जि.हिंगोली अंतर्गत येत नसून परभणी जिल्हा अंतर्गत समाविष्ट आहे. सेलू उपविभागांतर्गत सन २००८-२००९ मध्ये ३३/११ के.व्ही. नांदगांव उपकेंद्र दिनांक २९/१२/२००८ रोजी कार्यान्वित झालेले असून यामधून ११ के.व्ही.गणेशपूर फिडर, ११ के.व्ही वाघी फिडर व ११ के.व्ही. देवगांव फिडर कार्यान्वित आहेत. ११ के.व्ही गणेशपूर फिडर व ११ के.व्ही वाघी फिडरवरती SDT बसविण्यात आलेले आहेत. ११ के.व्ही फिडरवर गणेशपूर वाहिनीद्वारे फक्त कृषीपंपांना वीज पुरवठा केला जातो व या वाहिनीवर कोणतेही गाव, वाडी वस्ती अथवा तांडे यासाठी वीज पुरवठा जोडण्यात आलेला नाही. त्यामुळे सदर फिडरला बसविण्यात आलेला SDT कार्यान्वित नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथे गुंतवणूकदारांची फसवणूक करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१५) ९१५५ (२२-०६-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.अभिजित वंजारी, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील एजीएम कॉर्पोरेशन डिजिटल ॲडव्हर्टाईजमेंट कंपनीने आकर्षक योजनांचे प्रलोभन दाखवून शेकडो गुंतवणूकदारांची रुपये ३० कोटीहून अधिक रुपयांची फसवणूक झाल्याची घटना माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर येथील इथेरियम ट्रेड या फायनान्स कंपनीने हजारो गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचे दिनांक १० एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गुंतवणूकदारांची फसवणूक करणाऱ्या एजीएम कॉर्पोरेशन डिजिटल ॲडव्हर्टाईजमेंट कंपनीच्या डायरेक्टर तसेच, इथेरियम ट्रेड या फायनान्स कंपनीच्या संचालक मंडळास अटक करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गुंतवणूकदारांची फसवणूक करणाऱ्या कंपनीच्या संचालकांविरुध्द कारवाई करुन गुंतवणुकदारांचे पैसे त्यांना परत मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१६-१२-२०२१) :** (१) होय हे खरे आहे.

नागपूर येथील एजीएम कॉर्पोरेशन डिजिटल ॲडव्हर्टायझमेंट कंपनीने आकर्षक योजनांचे प्रलोभन दाखवून शेकडो गुंतवणुकदारांची फसवणूक केल्याबाबत पोलीस स्टेशन, सिताबर्डी येथे दिनांक १७/०४/२०२१ रोजी गुन्हा दाखल असून १ आरोपी अटक असून इतर आरोपीचा तपास सुरु आहे.
(२) होय हे खरे आहे.

इथेरियम ट्रेड या फायनांन्स कंपनीने गुंतवणुकदारांची फसवणुक केल्याबाबत यशोधरानगर पोलीस स्टेशन, नागपुर शहर येथे दिनांक १७ एप्रिल, २०२१ रोजी गुन्हा नोंद आहे. यात ३ आरोपी अटक असून दोषारोप पत्र न्यायालयात सादर करण्यात आले आहे. इतर ४ आरोपींचा शोध चालु आहे.
(३) एजीएम कार्पोरेशन डिजीटल ॲडव्हर्टाईजमेंट कंपनीच्या डायरेक्टर अजय कृष्णराव लधवे यांना अटक केली आहे व इतर ०३ डायरेक्टर यांचा शोध घेणे सुरु आहे. आरोपी व त्यांचे नातेवाईकांचे स्थावर व जंगम मालमत्ता यांचा शोध घेवुन त्या जप्त करण्याची कारवाई चालू आहे.

इथेरियम ट्रेड या फायनान्स कंपनीच्या ग्रुप लिडर/एजंट १) राजेंद्र रायभान खोब्रागडे २) श्रीकांत लक्ष्मणराव झिंबड ३) राजपाल वासुदेव देशभ्रतार यांना अटक करुन त्यांचेविरुध्द मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. आरोपी, मॅनेजिंग डायरेक्टर निशेद महादेवराव वासनिक व इतर आरोपी, सौ.प्रगती निशेद वासनिक, गजानन भोलेनाथ मुंगूणे, संदेश पंजाबराव लांजेवार, कु.साक्षी राजेंद्र खोब्रागडे यांचा शोध घेणे सुरु आहे.

(४) एजीएम कॉर्पोरेशन डिजिटल ॲडव्हर्टायझमेंट कपंनी विरुध्द पो. स्टे. सिताबर्डी येथे अप क्र.४६४/२०२० कलम ४०६, ४०९, ४२०, ३४ भा. दं. वि. सहकलम ३ एम.पी.आय.डी. कायदा १९९९ अन्वये गुन्हा दाखल असून गुन्हयाचा पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर शहर करीत आहे. डायरेक्टर अजय कृष्णराव लधवे यांना अटक केली आहे व ०३ डायरेक्टर यांचा शोध घेणे सुरु आहे व एजीएम कंपनी चे बँक खाती फ्रिज करण्यात आलेली आहेत. आरोपी व त्यांचे नातेवाईकांचे स्थावर व जंगम मालमत्ता यांचा शोध घेवुन त्या जप्त करण्याची कारवाई चालू आहे.

इथेरियम ट्रेड या फायनान्स कंपनीच्या ग्रुप विरुध्द पो.स्टे.यशोधरानगर, नागपुर शहर येथे अप.क्र.२८८/२१ कलम ४२०, ४०६, ४०९,१२० (ब), भा.द.वि. सह कलम ३, ४, एम.पी.आय.डी. कायदा १९९९ सह कलम ६६ (ड) माहिती तंत्रज्ञान सुधारणा अधिनियम २००८, रिझर्व बँक ऑफ इंडिया एक्ट १९३४ अधिनियम ५८ (ब) ५(अ) अन्वये गुन्हा दाखल असून डायरेक्टर निशेद महादेवराव वासनिक हा फरार असून त्याचे सोबत त्याची पत्नी सौ.प्रगती निशेद वासनिक, गजानन भोलेनाथ मुंगूणे, संदेश पंजाबराव लांजेवार यांचा शोध घेणे सुरु आहे. अटक आरोपी राजेंद्र खोब्रागडे यांचे एस.बी.आय.बँक वर्धमाननगर शाखेचे खाते गोठविण्यात आले आहे. इतर आरोपीच्या खात्याबाबत माहिती घेवुन कारवाई करण्यात येत आहे. आरोपींचा काही मालमत्तेचा शोध लागलेला असून आणखी जास्त मालमत्तेचा शोध चालु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गणेशपेठ, नागपूर येथील मध्यवर्ती बसस्थानकात हिरकणी कक्ष सुरु करण्याबाबत

**(१६) ९१५८ (१५-०७-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गणेशपेठ, नागपूर येथील मध्यवर्ती बसस्थानकावरील हिरकणी कक्ष बंद झाल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून

गणेशपेठ बसस्थानकावर स्तनदा मातांसाठी हिरकणी कक्ष उपलब्ध असताना याची घोषणा ध्वनीक्षेपकावरून करण्यात येत नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच, हिरकणी कक्षाच्या ठिकाणी विश्रामगृह तयार करण्यात आल्याने महिला प्रवाश्यांची बाळाला स्तनपान करतांना गैरसोय होत असल्याने राज्य परिवहन महामंडळातर्फे नवीन कक्ष तयार करण्याचा प्रस्ताव शासनाला पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागपूर येथील मध्यवर्ती गणेशपेठ बसस्थानकात हिरकणी कक्ष सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (०१-१२-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) गणेशपेठ नागपूर येथील मध्यवर्ती बसस्थानकाच्या नुतनीकरणाच्या कामात हिरकणी कक्षाचे महिला वाहक विश्रांतीगृहात रुपांतर करण्यात आले व त्या कालावधीत स्तनदा मातांकरीता बसस्थानकातील वेगळया कक्षात पर्यायी व्यवस्था करण्यात आली होती. सद्य:स्थितीत बसथानकात स्थानक प्रमुख कार्यालयासमोर हिरकणी कक्ष उभारण्यात आलेला आहे. तसेच, हिरकणी कक्षाबाबत प्रवाशांना ध्वनी प्रक्षेपकावरुन घोषणा/माहिती दिली जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगोली जिल्हयातील पुलांच्या बांधकामाबाबत

**(१७) ९१६० (२२-०६-२०२१) श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येहळेगाव सोळंके (ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली) येथील निशाणा गावाकडे जाणाऱ्या नदीवरील पुल मोडकळीस आला असून सदर पुलाची उंची कमी आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, बसमत शहराला जोडणाऱ्या कौठा रस्त्यालगत असलेल्या नाल्यावरील पुलाचे बांधकाम गत १ वर्षापासून संथगतीने सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यात अनेक ठिकाणी सुरू असलेल्या कामासाठी व रस्ता भरणीसाठी लागणाऱ्या साहित्यांची वाहतूक अवजड वाहनांव्दारे निशाणा गावाकडे जाणाऱ्या नदीवरील पुलावरून होत असून हिंगोली, औंढा नागनाथ व बसमत मार्गावरील कमी अंतर असल्यामुळे कौठा रोडवर वाहनांची मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असून या दोन्ही पुलांवर अपघात होण्याची भिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, पावसाळ्यात नाल्याला पुर आल्यास २ ते ३ दिवस हा मार्ग बंद राहतो, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, संथगतीने पुलाचे बांधकाम करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंते व संबंधित कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली तसेच, मोडकळीस आलेल्या पूलाची दुरुस्ती करुन अधिक उंचीचा पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१५-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

निशाणा गावाकडे जाणाऱ्या नदीवरील पुल मोडकळीस आलेला नाही. सदर पुल बारमाही वाहतुकीस योग्य आहे. मात्र पुलाची उंची कमी आहे.
(२) सदर पुलाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हाती घेण्यात आले असून, कोविड-१९ साथरोग आपत्कालीन परिस्थितीत लॉकडाऊनमुळे बांधकामाची गती संथ होती. तथापि, सदरचा पुल ऑगस्ट-२०२१ मध्ये पूर्ण करुन वाहतूक सुरळीत चालु करण्यात आली आहे.
(३) अंशत: खरे आहे.

निशाणा गावाकडे जाणाऱ्या नदीवरील पुलावरुन जडवाहतूक होत आहे. मात्र सदर पुल वाहतुकीस योग्य असल्याने अपघात होण्याची शक्यता नाही.
कौठा रोडवरील पुलाचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फ़त नुकतेच पूर्ण करण्यात आले असून, वाहतूक सुरळीत चालु असल्याने अपघात होण्याची शक्यता नाही.
(४) अंशत: खरे आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कौठा रोडवरील पुलाचे बांधकाम चालु असताना पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे वळण रस्त्यावर वाहतूक काही

काळासाठी बंद होती. मात्र आता पुलाचे काम पूर्ण झाल्यामुळे भविष्यात हा प्रश्न उद्‌भवणार नाही.
(५) कौठा रस्त्यावरील पुलाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पूर्ण करण्यात आले आहे. तसेच संथगतीबाबत कोविड-१९ आपत्कालीन परिस्थिती कारणीभूत असल्याने संबंधितावर कारवाई करण्याची आवश्यकता नाही.
निशाणा रस्त्यावरील उंच पुलाचे काम निधीचे उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे प्रयत्न आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यातील महिलांवर अत्याचार व विनयभंग करणाऱ्या गुन्हेगारावर कारवाई करण्याबाबत

**(१८) ९१७७ (१४-०६-२०२१) श्री.नरेंद्र दराडे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यात महिलांवरील अत्याचार व विनयभंगाचे गुन्हे वाढत असून अनलॉक काळात म्हणजेच माहे सप्टेंबर, २०२० ते मार्च, २०२१ अखेर या सात महिन्यात ५५ विनयभंगाच्या व २२ बलात्काराच्या घटना घडल्याचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अत्याचार व विनयभंगाच्या गुन्हेगारांवर कारवाई करुन महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१६-१२-२०२१) :** (१) माहे सप्टेंबर, २०२० ते मार्च, २०२१ अखेर या कालावधीत नाशिक पोलीस अधीक्षक यांचे कार्यक्षेत्रात बलात्काराचे ६६ गुन्हे आणि विनयभंगाचे १८७ गुन्हे दाखल झाले आहेत. तसेच, माहे सप्टेंबर, २०२० ते मार्च, २०२१ अखेर या कालावधीत नाशिक पोलीस आयुक्त यांचे कार्यक्षेत्रात बलात्काराचे ३८ गुन्हे आणि विनयभंगाचे ६० गुन्हे दाखल झाले आहेत.

(२) नाशिक पोलीस अधीक्षक यांचे कार्यक्षेत्रात दाखल बलात्काराच्या ६६ गुन्ह्यांमध्ये ७५ आरोपींना अटक करण्यात आली असून सदर ६६ गुन्ह्यांपैकी ६० गुन्ह्यांमध्ये मा.न्यायालयात दोषारोप दाखल करण्यात आले असून ०६ गुन्हे तपासावर प्रलंबित आहेत. विनयभंगाच्या १८७ गुन्ह्यांमध्ये १७८ आरोपींना अटक करण्यात आली असून सदर १८७ गुन्ह्यांपैकी १४६ गुन्ह्यांमध्ये मा.न्यायालयात दोषारोप दाखल करण्यात आले असून ४१ गुन्हे तपासावर प्रलंबित आहेत. तसेच, नाशिक पोलीस आयुक्त यांचे कार्यक्षेत्रात दाखल बलात्काराच्या ३८ गुन्ह्यांमध्ये ५२ आरोपींना अटक करण्यात आली असून सदर ३८ गुन्ह्यांपैकी ३५ गुन्ह्यांमध्ये मा.न्यायालयात दोषारोप दाखल करण्यात आले असून ०३ गुन्हे तपासावर प्रलंबित आहेत. विनयभंगाच्या ६० गुन्ह्यांमध्ये ६६ आरोपींना अटक करण्यात आली असून सदर ६० गुन्ह्यांपैकी ५७ गुन्ह्यांमध्ये मा.न्यायालयात दोषारोप दाखल करण्यात आले असून ०३ गुन्हे तपासावर प्रलंबित आहेत. महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आणि महिलांवरील अत्याचाराच्या घटनांना आळा घालण्यासाठी नाशिक पोलीस अधीक्षक आणि नाशिक पोलीस आयुक्त यांच्याकडून दामिनी पथक, निर्भया पथक, इ. ची स्थापना करण्यात आली आहे. पोलीस स्टेशन स्तरावर महिला दक्षता समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. महिलांकरीता हेल्पलाईन्स कार्यान्वित करण्यात आली आहे. शाळा, महाविद्यालये, गर्दीच्या ठिकाणी पोलीस पॅट्रोलिंग करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जिंतूर (जि.परभणी) शहरातील ट्रामा केअर सेंटरला नियमित वीज पुरवठा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१९) ९२०८ (१३-०७-२०२१) श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिंतूर (जि.परभणी) येथील ट्रामा केअर सेंटर येथे वीज जाण्याचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ट्रामा केअर सेंटरमधील कोरोनाचे उपचार घेणाऱ्या रुग्णांचे वीज जाण्याने गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ट्रामा केअर सेंटरमधील वीज जाण्यामुळे रुग्णांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी शासकीय योजनेतून पूर्णवेळ वीज लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१७-१२-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

जिंतूर (जि.परभणी) येथील ट्रामा केअर सेंटर येथे एप्रिल व मे महिन्यात मान्सूनपूर्व देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी काही वेळेस वीज पुरवठा बंद करण्यात आला होता. त्यावेळेस ट्रामा केअर सेंटरचा वीज पुरवठा लगतच्या वाहिनीवरुन चालू करुन दिला होता.

(२) हे खरे नाही.

११ के.व्ही शिवाजीनगर या वाहिनीवरील जिंतूर (जि.परभणी) येथील ट्रामा केअर सेंटरचा पुरवठा अपरिहार्य कारणास्तव खंडीत झाल्यास, पर्यायी व्यवस्था म्हणून लगतच्या ११ के.व्ही हुतात्मा या दुसऱ्या वाहिनीद्वारे विद्युत पुरवठा जोडण्यात येतो.

(३) ११ के.व्ही.शिवाजीनगर या वाहिनीवरील जिंतूर (जि.परभणी) येथील ट्रामा केअर सेंटरचा वीज पुरवठा अपरिहार्य कारणास्तव खंडीत झाल्यास, पर्यायी व्यवस्था म्हणून लगतच्या ११ के.व्ही हुतात्मा या दुसऱ्या वाहिनीद्वारे विद्युत पुरवठा जोडण्याची व्यवस्था आहे. त्याद्वारे ज्यावेळी ११ के.व्ही शिवाजीनगर फिडरचा विद्युत पुरवठा बंद होतो त्यावेळेस ट्रामा केअर सेंटरचा विद्युत पुरवठा लगतच्या ११ के.व्ही हुतात्मा वाहिनीवरुन चालू करुन देण्यात येतो. तथापि, जर काही नैसर्गिक आपत्तीमुळे अपरिहार्य कारणास्तरावर विद्युत पुरवठा खंडीत झाल्यास तातडीने सुरळीत ठेवण्यासाठी जिंतूर शहरातील ट्रामा केअर सेंटरला त्यांचे स्तरावर जनित्राची (Generator) पर्यायी व्यवस्था करण्यासाठी महावितरणमार्फत लेखी कळविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## करंबेळी ठाकूरवाडी ते खडई धनगरवाडा (ता.खालापूर, जि.रायगड) रस्त्याच्या कामाकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२०) ९२७० (१५-०७-२०२१) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करंबेळी ठाकूरवाडी ते खडई धनगरवाडा (ता.खालापूर, जि.रायगड) या रस्त्याच्या कामाबाबत शासकीय पोर्टलवर ग्रामस्थांनी केलेल्या मागणीनुसार त्यास रायगड जिल्हा परिषदेने मंजूरी देऊन ६० लाख रुपये खर्चाचा रस्ता जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून करण्यात येईल असा प्रस्ताव तयार केल्याचे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, जिल्हा परिषद, रायगड यांचेकडून ग्रामस्थांना कळविण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा नियोजन समितीमध्ये सदर रस्त्याचा कोणताही प्रस्ताव नसल्याचे आता कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, जिल्हा परिषद, रायगड यांनी ग्रामस्थांना कळविले असल्याचे दिनांक ११ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंजूर झालेल्या रस्त्याबाबत ग्रामस्थांकडून जिल्हा परिषद, रायगड कार्यालयावर दिनांक २ मे, २०२१ रोजी मोर्चा काढून अधिकाऱ्यांना घेराव घालण्यात येईल असे जिल्हा परिषद प्रशासनास कळविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दरम्यानच्या काळात "करंबेळी ठाकूरवाडी ते खडई धनगरवाडा हा साडेचार कि.मी. चा रस्ता प्रस्तावित होता पण जिल्हा नियोजन समितीमार्फत निधी मिळाला नाही आता नव्याने दीड कोटीचा प्रस्ताव तयार करु" आणि पुढची कार्यवाही करु असे जिल्हा परिषदेचे संबंधित कार्यकारी अभियंता यांनी सांगितले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने करंबेळी ठाकूरवाडी ते खडई धनगरवाडा या रस्त्याच्या कामाबाबत जिल्हा नियोजन समितीमार्फत निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०९-११-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे. करंबेळी ठाकुरवाडी ते खडई धनगरवाडा हा रस्ता रस्ते विकास आराखडा सन २००१-२१ मध्ये समाविष्ट नाही. मात्र रस्ते विकास आराखडा सन २००१-२१ मधील करंबेळी ते करंबेळी ठाकुरवाडी (ग्रामा-१३२) या रस्त्याचा रुपये ६०.०० लक्षचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीस सादर करण्यात आल्याचे कळविण्यात आले होते.

(२) हे खरे नाही.

(३) अंशत: खरे आहे. ग्रामस्थांनी दिनांक ०९/०४/२०२१ रोजी जिल्हा परिषदेला कळविले आहे. मात्र सदर पत्रात करंबेळी ते करंबेळी ठाकुरवाडी या रस्त्याची मागणी केलेली आहे.

(४) व (५) करंबेळी ठाकुरवाडी ते खडई धनगरवाडा हा रस्ता रस्ते विकास आराखडा सन २००१-२१ मध्ये समाविष्ट नाही. परंतु ग्रामस्थांमार्फ़त करंबेळी ते करंबेळी ठाकुरवाडी (ग्रामा-१३२) या ४.६०० कि.मी. लांबीच्या रस्त्याची मागणी केलेली होती. त्यानुसार सन २०२०-२१ या वर्षामध्ये जिल्हा नियोजन समिति, रायगड आराखड्यामध्ये सदर रस्त्यासाठी रुपये १५०.०० लक्षची मागणी प्रस्तावित केलेली आहे. मात्र अद्याप निधी उपलब्ध झालेला नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **श्री.राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.